# सेवक वार्ता

ऑगस्ट - २०२६

वर्ष-७ अंक-१०

नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र

## कॅम्पा उपक्रम त्रयस्थ-पक्षीय (third-party) देखरेख व मूल्यमापनासाठी संस्थांच्या सूचीबद्धतेकामी सहभागासाठी सेवक संघाचा प्रस्ताव सादर

CAMPA-निधीप्राप्त उपक्रम आणि योजनांच्या त्रयस्थ-पक्षीय (third-party) देखरेख व मूल्यमापनासाठी संस्थांची सूचीबद्धता (empanelment) करण्याबाबत 'स्वारस्य अभिव्यक्ती' (Expression of Interest - EoI) केंद्रीय सार्वजनिक खरेदी पोर्टलवर (Central Public Procurement Portal)संबंधात जाहिरात ३० जुलै रोजी नॅशनल CAMPA च्या वेबसाइटवर प्रसिध्द झाली होती. त्यात फक्त पॅनेलमध्ये समाविष्ट होण्यासाठी आणि तृतीय-पक्ष मूल्यांकनासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EoI) मागवणारी ही सूचना उपलब्ध झाली होती. या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे, आर्थिक पात्रतेच्या निकषांनुसार (क्षमता), अर्जदार संस्थेने मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये किमान ५ कोटी रुपये किंवा त्याहून अधिक सरासरी वार्षिक उलाढाल असल्याचे सिद्ध करणे आवश्यक होते. तथापि, वार्षिक उलाढालीबाबतची अटीबाबत सरकारी, निम-सरकारी, अर्ध-सरकारी तसेच शैक्षणिक आणि संशोधन संस्थांना यातून सवलत देण्यात आली आहे. मात्र, 'सेवक' (SEVAK) ही संस्था या सवलतप्राप्त संस्थांच्या श्रेणीत येत नसल्याने, वि चारमंथन होऊन, चंद्रपूर प्रबोधिनी सोबत संयुक्त उपक्रम (JV) राबवण्याचा विचार मांडण्यात आला. त्यावर, 'चंद्रपूर वन अकादमी'च्या (Chandrapur Forest Academy) संदर्भात शक्यता पडताळून पाहण्याची कल्पना सेवक संघाचे मार्गदर्शक पत्की सरांनी सुचवली. कार्यकारी अध्यक्ष यानी चंद्रपूर अकादमीशी वाटाघाटी करण्याची शक्यता पडताळावी अशी सूचना पुढे आली होती. त्यानुसार, कार्यकारी अध्यक्ष डॉ. एस. एच. पाटील यांनी त्याकामी समक्ष श्री. आर. एम. रामानुजम, संचालक चंद्रपूर वन अकादमी'च्या वाटाघाटी करून मूर्त रूप दिले व पुढील वेगवान हालचाली झाल्या. CAMPA EoI प्रस्ताव तयार करण्यासाठी, सर्वश्री. बळवंत सेलूकर, संजय जगताप, प्रमोद सुतळे आणि गुरुराज सुगुरे, यांनी कमी वेळात, प्रचंड मेहनत करुन प्रारूप तयार चंद्रपूर वन अकादमीमार्फत MoEFCC, GoI ला ई-मेलद्वारे EoI दस्तऐवज दि. २१ ऑगस्ट रोजी वेळेवर सादर केला. ही सेवक संघाची राष्ट्रीय पातळीवर कामासाठी घेतलेली निश्चित मोठी झेप आहे. त्यात अनेकांचा हातभार लागला व सदस्यांच्या सांधिक क्षमतेचे बलस्थान दिसून आले.

कार्यकारी अध्यक्ष डॉ. एस. एच. पाटील यांनी हे अवघड काम तडीस नेल्याबद्दल सर्वांचे भरभरून कौतुक केले. श्री. सेलुकर यांनी कागदपत्रांचा तपशीलवार अभ्यास करून CV इत्यादींची छाननी केल्याबद्दल, सर्वश्री. संजय जगताप, संभाजी गवळी, गुरुराज यांनी कागदपत्रांची प्रक्रिया वेळेवर केल्याबद्दल, श्री प्रमोद सुतळे यांनी CFA सोबत समन्वय साधल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. आणि श्री. पत्की सरांना या संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने लक्ष दिल्याबद्दल आणि मार्गदर्शनाबद्दल धन्यवाद दिले.

तसेच सेवक संघाचे अध्यक्ष_श्री. विश्वास सावरकर, जे या कामात चमू प्रमुख आहेत, त्यांनी याकामी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल सर्व संबंधितांचे व CFA चे आभार व्यक्त केले आहेत.

या कामात ३० जणांचा समावेश असून ते वानिकी, वन्यजीव, जैवविविधता, कार्य आयोजना, वन संशोधन, सामाजिक वनीकरण, संगणक शास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्षमता विकास, डाटा अनालिसिस, वन व्यवस्थापन, सनियंत्रण व मूल्यांकन, संवर्धन शास्त्र, वन प्रशिक्षण, वन व्यवस्थापन, वनीकरण, प्रकल्प व्यवस्थापन, समाजशास्त्र जिओ मीडिया, रिमोट सेन्सिंग,जीआएस,डाटा एनॅलिटिक्स, अर्थशास्त्र, वन अभियांत्रिकी, पारिस्थितीकी विकास अशा विविध विषयातील तज्ञ आहेत.

## सेवक संघ, चंद्रपूर शाखा वार्ता

दिनांक १२-७-२०२६ रोजी सेवक संघ चंद्रपूर शाखेची सिंदेवाहीला वार्षिक सर्व साधारण सभा संपन्न झाली होती. त्या सभेत निर्णय होऊन चंद्रपूर सेवक संघ शाखेतील ४ वर्षे कार्यकाळ पुर्ण झालेल्या दोन पदाधिका-यांची सर्वानुमते फेरनिवड होऊन इतर नवीन पदाधिका-यांचीही निवड करण्यात आली व नूतन कार्यकारी समिती गठीत करण्यात आली. नुकतीच दिनांक २-८-२०२६ रोजी या नूतन कार्यकारी समितीची सभा घेण्यात येऊन त्यात कार्यभार हस्तांतरण देणे-घेणेची पूर्तता करण्यात आली.

नविन कार्यकारीणीचे पदाधिकारी खालील प्रमाणे आहेत.

1) सह अध्यक्ष.. श्री एस.बी.पंधरे, मो.नं. 8390442228
2) उप सहअध्यक्ष..पि. व्हि. उरकुडे, मो. नं. 9404536550
3) कोषाध्यक्ष.. श्री एस.ए.बत्तुलवार, मो. नं.9764650464
4) सचिव.. एस.सी.गुरनुले, मो.नं.9422912991
5) सह सचिव.. व्हि.बी.कामडी, मो.नं.9420011512.

या नविन पदाधिकारी नियुक्त कार्यकारी समि तीची केंद्रीय कार्यकारिणीने नोंद घ्यावी असे विनम्र आवाहन माजी सह अध्यक्ष श्री. विजय खनके यांनी केले.

नवीन कार्यकारिणीचे केंद्रीय कार्यकारी समितीच्या पदाधिका-यांनी अभिनंदन करीत नवनियुक्त पदाधिकारी जोमाने काम करतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

चंद्रपूर-गडचिरोली वनवृत्ताच्या नवीन सेवक समितीचे स्वागत व अभिनंदन करतांना कामांचा शोध व पाठपुरावा करण्यास या वृत्तांत मोठी संधी आहे, असे श्री. पत्की सरांनी नमूद केले आहे.

## राहिल्या त्या आठवणी.....




लेखक: विठ्ठल त्र्यंबक पत्की

### गुन्हे कामातील लाकडांचा लिलाव -

कासा येथे दर सहा महिन्यांनी गुन्हे काम निकाली काढलेल्या प्रकरणातील लाकडांचा लिलाव होत असे. त्याची अपसेट प्राईस वनक्षेत्रपाल कासा तयार करुन वि.व.अ. यांचेकडे मंजूरीसाठी पाठवित असत. मला नाडकर्णी साहेबांनी लिलाव करण्याच्या सूचना देऊन, अपसेट प्राईस लखोटा वनक्षेत्रपाल कासा यांचेकडे पाठविला असल्याचे सांगीतले.

मी, कासा येथे जावून श्री. ए. पी. भातखंडे, वनक्षेत्रपाल कासा यां सदर लखोट्याची मागणी केली. लखोटा अद्यापी आला नाही, पण वनक्षेत्रपाल यांनी प्रस्तावीत केलेली किंमत जास्तीत जास्त १०% वाढवून वि.व.अ. मंजूर करतात असे ज्येष्ठ व अनुभवी श्री. भातखंडे यांनी मला सांगून लिलाव सुरु करण्याची विनंती केली. मी, त्यानुसार लिलाव प्रक्रिया पूर्ण केली.

थोड्याच वेळात वि.व.अ. यांनी मंजूर केलेल्या किंमतीचा लखोटा माझे हातात पडला. तो उघडून, मी लिलावबंदावरील किंमती पडताळून पहाता मला आढळले की सुमारे ९ गटांच्या किंमती मंजूर अपसेट प्राईस पेक्षा कमी असून, त्यांचा लिलाव मी तीन वार मान्य केला आहे. आता, माझी पाचावर धारण बसली आणि माझा क्रोधाग्नी श्री. भातखंडे यांचेवर कोसळला होता. शांतपणे त्यांनी मला सांगीतले की साहेब रागाऊ नका, मी सावट्यास जावून अरविंदभाईंकडून नवीन कोरे लिलाव बंद सही करुन घेऊन येतो. अरविंदभाई हे एक गुजराथी सज्जन व्यापारी होते. दोन तासांतच श्री भातखंडे व अरविंदभाईंनी पूर्तता करून मला दिलासा दिला. महत्वाची कामे दुसऱ्याच्या भरवशावर कधीही पार पाडू नयेत ही शिकवण मला या लिलावातून मिळाली.

### बोर्डी येथील वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय-

१९६९ साली बोर्डी येथे एका पारशी सज्जनाचे बंगल्यावर वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय होते. तिथे आठवड्यातून एक दिवस जाऊन वनसंवर्धनशास्त्र शिकविण्याचे आदेश मला मिळाले. बोर्डीचे (घोलवड) चिकू प्रसिध्द होते, शहाळी पण भरपूर मिळायची व ती मधूर/मलाईदार असायची. श्री.एन.जे. पर्वते नावाचे वनपालातून पदोन्नत झालेले वनक्षेत्रपाल बोर्डी येथे कार्यरत होते. त्यांचे वनविषयक कायद्यांचे ज्ञान उत्तम होते आणि स्थानिक न्यायाधीश यांचेशी संबंध सलोख्याचे होते. श्री. पर्वते माझ्या दुपारच्या भोजनाची व्यवस्था त्यांचे घरी करित असतं. सौ. पर्वते जणू अन्नपूर्णा व सुगरण होत्या. एक वर्षातच श्री. ख्रिस्ती साहेबांनी माझी निवड डेहराडून येथील पहिल्या वन्यजीव व्यवस्थापन पदविका कोर्स साठी केली.

### वन्यजीव व्यवस्थापन पदविका प्रशिक्षण -

श्री. ख्रिस्ती साहेबांनी मला या प्रशिक्षणासाठी डेहराडूनला पाठविले. हा पहिलाच कोर्स होता, ०१-०४-१९७० ते ३०-०९-१९७० कालावधीचा. महाराष्ट्रातील पाच सहाय्यक वन संरक्षक होते. सर्वश्री गुरूदयालसिंग कंड्ये /आर. डी. गडकरी/ एच. एन. तत्ववादी / एम. एन. सरुप/आणि मी. इतर राज्यातील पाच होते. त्यांची नावे सर्वश्री व्ही.बी. गौड (उत्तरप्रदेश) /रामेश्वर (आंध्रप्रदेश) / पी. के. नायक (मध्यप्रदेश) / आर. आर. सहाय (बिहार)/ भीष्मसिंह (राजस्थान). २०२५ सालात मी आणि श्री गौड वगळता इतर सर्व दिवंगत झाले आहेत. मला मेस सेक्रेटरी पदाची जबाबदारी दिली होती. ओडीसा राज्यातील श्री. सरोज राज चौधरी साहेब बहुतांशी काळ शिकवीत असतं. त्यांचे खैरी या वाघीणीच्या सहवासातील पुस्तक प्रसिध्द आहे. Tiger Pugmark Census चे जनक होते. भारत शासनाने त्यांना मरणोत्तर "पद्मश्री" बहाल केली होती. १९८१ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांच्या सहवासात मी वन्यजीव व्यवस्थापनातील बारकावे शिकलो.

### चिला शुटींग ब्लॉकमधील ४० दिवस प्रशिक्षण-

एप्रिल १९७० चे शेवटच्या आठवड्यात आम्हाला चिला येथे प्रशिक्षणासाठी नेण्यात आले. कापडी तंबुत मुक्काम होता. पवित्र गंगा नदीच्या किनारी हरिद्वारचे पलीकडील तीरावर, सुमारे सात किलोमीटर अंतरावर आमचा कैंप होता.चौधरीसाहेब आम्हाला रोज सकाळी

६.०० ते ८.०० पर्यंत बर्ड वॉचिंग करिता भ्रमंती करवीत होते. त्यानंतर आंघोळ व नाष्ट्यासाठी दीड तास ब्रेक असे. ९.३० वा. खाकी गणवेशात सगळे वन भ्रमंतीला तयार होत असत. बहुतेक वेळा पॅकलंच घेऊनच जात होतो. या चिला क्षेत्रात वाघाचे व्यतिरिक्त हत्ती, बिबट, अस्वले, सांबर, हरिणे, चौसिंगा,यांचे वास्तव्य होते. गुज्जर लोक पाळीव जनावरांना खाद्य पुरविण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांच्या पालवीचे लॉपिंग करित. प्रत्येक प्राणी व पक्षी यांच्या जीवनशैलीचे बारकावे चौधरी साहेब समजावून सांगत. त्यांचा बंदुकीचा नेम अचूक होता. सुमारे ५'-३" उंचीचे परंतु निधड्या छातीचे साधे पण शूर व्यक्तीमत्व होते.

(क्रमशः)...

## माझी फोटोग्राफी -८

प्रमोद यादव, सेनि भाप्रसे

आज तारीख 29.09. 2025.

रात्री माउंट एव्हरेस्टच्या कुशीत झोपी गेलो. झोप अशी तेथे येतच नव्हती. फक्त म्हणयाच झोपी गेलो. मागील दोन दिवस सकाळी उकडलेली दोन अंडी आणि रात्री जेवताना दोन अंडी फक्त खात होतो. आज देखील सर्व आवरल्यानंतर नाश्त्यासाठी दोन अंडी खाऊनच निघणार होतो. कारण तिथे काही खाण्याची इच्छाच होत नव्हती. अंडी खाऊन दिवस काढत होतो. त्याला दुसरा उपाय जरी असला तरी शरीराची आणि मनाची दुसरं काही खावं अशी इच्छाच होत नव्हती. 500 रुपयाला विकत घेतलेली एक पाण्याची बाटली शरीरातील ऑक्ससीजन लेवल न कळत वाढवत असे. तेच पाणी त्यावेळी त्या हवामानात शरीरासाठी अत्यंत महत्वाचे असे टॉनिक होते.

लवकरच उठल्यामुळे काही फोटो मिळतात का म्हणून कॅमेरा तयार केला होता. कॅमेरा तयार करणे म्हणजे बॅटरी किती आहे, कार्डवर किती फोटो निघाले आहेत, अजून किती फोटो कार्डवर घेता येतील आणि लेन्स वगैरे पुसून तयार केला होता. ट्रेक फोटो साठी सोबत चार बॅटऱ्या घेतल्या होत्या, त्यातील तीन आत्तापर्यंत संपल्या (डिस्चार्ज) होत्या.एक बॅटरी शेवटची जपूनच वापरावी लागणार होती.कारण तेथे बॅटरी चार्जिंगची सोयच नव्हती. परंतु उद्याचा मुक्काम नामचे बाजार येथे होणार असल्याने तिथे चार्ज करता येतील हे मला माहीत होते. त्यामुळेच बॅटरी जपूनच वापरत होतो.

सूर्योदय झाल्यावर माऊंट एव्हरेस्टचे काही फोटो मिळतात का ते पाहिले. हॉटेल रूमचे बाहेर आल्यानंतर कॅमेरा घेऊन बाहेर आलो परंतु समोर पाहतो तो आज शिखरावर दाट ढग असल्यामुळे व पूर्ण शिखर झाकून गेल्यामुळे एकही फोटो घेता येत नव्हता. माऊंट एवरेस्ट कोठे आहे ते देखील समजत नव्हते. त्यामुळे तेथील काहीच फोटो काढता आले नाहीत. सर्व आवरून आता परतीचा ट्रेक प्रवास सुरू होणार होता. सर्व ग्रुप तयार झाला होता. गरम चहा व उकडलेली अंडी खाऊन परतीच्या ट्रेकिंगला सुरुवात झाली. आता माउंट एवरेस्टचे दर्शन पुन्हा एकदा घेण्याची इच्छा झाली ,परंतु दाट धुक त्यामुळे काहीच दिसत नव्हते. फोटो एकही घेता आला नाही. तेथील हवामानातील बदल प्रकर्षाने जाणवत होता. थोडीशी हालचाल केली तरी धाप जोरदार लागत असे.

ग्रुपमधील काहीं अतिउत्साही मंडळींनी काला पत्थर येथे जाण्याचे ठरवले होते.काला पत्थर हे तेथील एक ठिकाणचे नाव आहे. तेथून एवरेस्ट शिखराचे सुरेख दर्शन घडते.ते पहाटे तीन वाजताच उठून काला पत्थर म्हणजे अजून तीनशे मीटर उंचीवर ते जाणार होते. पण प्रचंड धुके यामुळे त्यांनी तेथे जाण्याचा बेत (प्लॅन) रद्द केला. त्यांच्यापुढे दुसरा पर्यायच नव्हता शांतपणे गादीवर झोपून जाणे एवढेच त्यांच्या हातात होते. काला पत्थर येथून माउंट एवरेस्टचे अजून चांगले दर्शन घडते आणि सूर्योदय त्यांना तेथून पाहायचा होता. पण ते त्यांना शक्य झाले नाही.

आज 1000 मीटरने खाली आम्ही उताराचे बाजूस जाणार होतो. आजचा ट्रेक गोरकशेप (ऊंची5364 मीटर / 17598 फुट )ते पेरीचे(ऊंची 4370 मीटर / 14340 फुट ) अंतर 20 किलोमीटर होते. पेरीचे येथे आज मुक्कामी जाणार होतो. परतीचा ट्रेक सुरू झाला होता. वाटेत मोठ मोठे दगड धोंडे होते.रस्ता असा नव्हताच, पण पुढचा चाललाय त्याच्याच मागे हळूहळू आपण चालायचे. हाच नियम सर्वांसाठी होता. त्यात बदल केला तर नक्कीच काहीतरी अडचण तयार होत असे. याच ट्रेक मध्ये चालत असताना वाटेमध्ये काही स्मारके दिसली. मिहीर आमचा टूर गाईड याने माउंट एव्हरेस्ट शिखर सर करताना जे गिर्यारोहक मृत्युमुखी पडले त्यांची ही स्मारके आहेत असे सांगितले. त्यामध्ये विविध देशातील कोणी तरी मृत्यू मुखी पडलेला गिर्यारोहक होता. माउंट एवरेस्ट शिखर आत्तापर्यंत 7279 लोकांनी ते सर केले आहे. परंतु हे शिखर सर करताना 335 लोकांना स्वतचे बलिदान करावे लागलेले आहे. त्यांची ही स्मारके तेथे त्यांच्या चाहत्यांनी, नातेवाईकांनी उभी केली आहेत. काही ठिकाणी मोठे दगड होते त्यांनाच एखाद्या लोखंडी प्लेटवर त्यांचे फोटो काढून त्या ठिकाणी ते स्क्रूने डकवलेले होते.काही ठिकाणी छोटी बांधकाम होती. हे पाहून खूपच वाईट वाटले आणि त्यांचे बद्दल कुतूहल जागे झाले म्हणून मी बारकाईने ती स्मारके पाहिली. त्यांचे काही फोटोही काढले.

हे पाहिल्यानंतर पुढे मी माउंट एवरेस्ट चे युट्युब वर अशा प्रकारच्या ज्यांची मृत्यू झालेले आहेत त्यांच्याबद्दलची माहिती घेतली. आणि भयानक वास्तव त्या युट्युब विडिओ मधून समजले. आपण देखील

यूट्यूब वर पाहू शकता. या सर्व 335 लोकांची मृत शरीरे माउंट एवरेस्ट शिखरावर कायमची चिरनिद्रा घेत आहेत. थोडक्यात तेथील जी जागा आहे त्या बर्फामध्ये त्यातली काही गाडलेली आहेत काही उघडी आहेत. ही मृत शरीरे एखाद्या पुतळ्या प्रमाणे तेथे होऊन जातात. कारण थंड हवा मानात ती खराब होत नाहीत. या ठिकाणी टेंपरेचर सतत मायनसच असते. तेथे फार पूर्वी गिर्यारोहकानी टाकलेल्या चॉकलेट आजही तशाच अवस्थेत मिळतात त्या खराब झालेल्या नाहीत. या ठिकाणी सर्व धर्मसमभाव समान असलेली ती एक वेगळीच जागा आहे. एवढा समोर मृत्यू दिसत असताना शिखर सर करायचे यासाठी मनाची तर तयारी हवीच पण त्यासाठी खूप मोठं शरीराची ताकद देखील हवी असते.

8000 मीटरचे वर गेल्यावर डेथ झोन सुरू होतो. या ठिकाणी अनेक गिर्यारोहक थकतात. बऱ्याच जनाना त्रास होतो. काहींचे सेल निकामी होतात. त्या ठिकाणी चक्कर येणं, बेशुद्ध पडणे , मेंदू काम न करणे अस होतं. त्यातूनच त्या गिर्यारोहकाचा मृत्यू देखील होतो. हे ऐकल्यानंतर हे शिखर सर करणाऱ्यांना प्रणाम. कारण साक्षात समोर मृत्यू असताना हे शिखरवर चढण्यासाठी जाणे, आणि तेथून परत येणे यासाठी नशीब बलबत हवे.साक्षात मृत्यू समोर असताना शिखराला गवसणी घालणे सोपे नाही. हे आव्हान गिर्यारोहक स्वीकारतात. माउंट एव्हरेस्ट वर शिखरावर मृत्यू आला तर एवरेस्टच्या कुशीत कायमची चिरशांती घेतात.

हे स्मारक पाहताना खूप वाईट वाटले आजही माझ्या नजरेसमोरून हिमालयातील माउंट एवरेस्टच्या वाटेवरील ते ठिकाण नजरेपासून अजिबात दूर जात नाही.साक्षात आपण त्याच ठिकाणी अजूनही उभे आहोत असे वाटते. ज्यांची स्वप्न पूर्ण झाली त्यांना शालूट करतो आणि तिथे मृत्युमुखी पडले त्यांना आदरपूर्वक श्रद्धांजलि अर्पण करतो. तेथील भयानक हे सत्य पाहता माउंट एवरेस्ट शिखर सर करणे म्हणजे साक्षात मृत्यूला जवळ करणे. या ठिकाणचे काही फोटो काढून निघालो. ट्रेक खडबडीत होता वाटेत मोठे मोठे दगड तर होतेच. पेरीचेच्या दिशेने निघालो असताना दुपारच जेवण मागील वेळेस जेथे केल होते तेथेच केल. बहुतेकांना बटाटा पराठा खायची इच्छा झालेली होती,तो त्यांनी तिथे खाल्ला. आम्ही आपले दोन उकडलेले अंड्यावरच होतो. परंतु मनाची तयारी खूप होती त्याला शरीर देखील साथ देत होते म्हणून ट्रेक चालत होतो. दुपारचे जेवण करून पुढे निघालो, खालील बाजूस उतरलो असता, अचानक वातावरणात प्रचंड बदल झाला. जोरदार धुके वाहू लागले होते. वीस फुटावरले देखील काही दिसेना. पुढचा चाललाय त्याच्यामागे हळूहळू आम्ही चालत होतो. या अशा बदलत्या हवामानात जवळ जवळ सात किलोमीटर आम्ही चाललो. आणि पेरीचीच्या जवळ पाच वाजता पोचलो त्या ठिकाणी धुके विरळ झालेल होते. हॉटेलच्या तिथे वातावरण छान झाले होते. हॉटेलचे नाव होते पामेरी. माऊंट एवरेस्ट जवळ जे उंच शिखर आहे त्याचे नाव पामेरी. पाच वाजता हॉटेलच्या तिथं पोहोचलो. येथे ऑक्सिजन बरा होता. बरा म्हणजे बेस कॅम्प पेक्षा थोडा ठीक. हॉटेल पामोरी छानच होते. दुसऱ्या दिवशी उठल्यानंतर बाहेर पाहिल्यानंतर सुंदर असं नितळ आकाश आणि समोरचे बाजूला उंच पर्वत दिसत होता. सर्वांना ऑक्सिजन थोडा जास्त मिळू लागल्याने धाप कमी लागत होती. पण ग्रुप मधील बहुतेक सर्वांना कफ झाला होता. खोकला देखील येत होता. जो कफ झाला त्याला खुंबू व्हॅली कफ असे म्हणतात. तेथील हवामानामुळे तो सर्वानाच होतो.तो सर्वांना त्रासदायक झाला होता. शरीराचा उत्साह या कफ मुळे कमी झाला होता.

क्रमशः

००००००

## नवीन लेखमाला: माझे सेवक-माझे चालक

### माझे सेवक-माझे चालक"

लेखक....... विठ्ठल त्र्यंबक पत्की

(लेखांक – १)

१. प्रस्तावना

भारतात शास्त्रीय वन व्यवस्थापन १८६४ साली सुरु झाले असे इतिहास सांगतो. माझी वन सेवेस सुरुवात त्यानंतर सुमारे शंभर वर्षांनी, म्हणजे १९६५ साली झाली. त्यावेळी आणि अजूनही काही दुर्गम वनक्षेत्रात रस्ते, वाहतुक, निवास, खाद्यसेवा उपलब्ध नाही. वनरक्षक/ वनपाल यांना सेवक मिळत नाहीत. त्यामुळे त्यांना उदरनिर्वाह करण्यासाठी स्वयंपाक करणे शिवाय पर्याय नसतो. वनक्षेत्रपाल, सहाय्यक वनसंरक्षक, भारतीय वन सेवेतील अधिकारी यांना मात्र सेवक (शिपाई /ऑर्डर्ली) दिले जातात. हे सेवक अशा अधिकारींचे जीवनमान सुरळीत राहणयासाठी प्रयत्न करतात आणि जीवनाचा रथ पुढे ढकलतात. चांगला सेवक आपले पदरी असावा म्हणून अधिकारी वर्गात चढाओढ असते. नशीबानुसार प्रत्येकास बरा-वाईट सेवक मिळतो.

जुन्या काळात वन रक्षक पदावर नोकरीत येण्यासाठी चढाओढ नव्हती. त्यांची सेवा भरती करतांना विभागीय वन अधिकारी त्यांना मोजकेच सवाल करित असतं.

त्यातील पहिला सवाल "स्वयंपाक करता येतो कां?"
दुसरा सवाल, "वनक्षेत्रात रोजंदारीवर, यापूर्वी कोणती कामे, किती कालावधीसाठी केली आहेत ?"
तिसरा सवाल, " शिक्षण किती झाले आहे, म्हणजे मराठी लिहिता/ वाचता येते का?"
त्यातील पहिला सवाल फार महत्वाचा आहे.

मी मात्र सेवेत असतांना बहुतेक ठिकाणी चांगले सेवक व चांगले वाहन चालक यांच्या सान्निध्यात होतो. याला सुध्दा चांगले नशीब असावे लागते बरं !
यांचे पुढील भागात टप्प्याने, निवडक सेवक आणि चालक यांच्या व्यक्तीरेखा अवगत करुन, त्यांचा गौरव करण्याचा माझा मानस आहे.

---

 ♻♻♻♻

| पंचाक्षरी कविता |
|---|
| अर्थ जपावा, मांडण्याआधी |
| रंग जपावे, उडण्याआधी |
| मन जपावे, मोडण्याआधी |

## झाड प्रकटते
डॉ. शेषराव पाटील

झाड प्रकटते फुलाफळातून
मिळते त्याला उर्मी आतून
घेतल्याचे काही सृष्टीतून
करते परतफेड दुपटीहून

नाही काही त्याला आशा
देण्याचाच जणू घेतला वसा

आनंदाने नदी वाहते
भरभरून सर्वांना देते
कुणी पाणी पिते
कुणी पाय धुते

कुणालाही ना अंतर देते
सर्वांना आपलेच समजते
कधी न तिचे देणे थांबते
शेवटच्या थेंबापर्यंत देते

सूर्य उगवतो प्रकाश देतो
सृष्टीमध्ये जीवन फुलवतो
कुणी अर्ध्य देवो ना देवो
कुणाची न तो वाट पाहतो

पक्षी गाती मंजुळ गाणी
ऐको वा ना ऐको कुणी

## मैत्रीचे नाते
सौ नंदा विठ्ठल सूर्यवंशी, पुणे

मैत्रीत शब्दांची गरज नसते
तिला ह्रदयाची भाषा कळते
सुखदुःखाच्या प्रत्येक वळणावर
साथ मात्र हुकमी असते

अश्रूंचा अर्थ कळतो
हास्याची लय समजते
मैत्रीचा स्पर्श असा
उन्हातही चांदणे हसते

ह्रदयाने कधी दूर जात नाही
आठवणी विरून जात नाहीत
विश्वासाच्या या धाग्यांना
काळा लाही तोडता यात नाही

देवाकडे एकच मागणे
प्रत्येकाला हे नाते लाभावे
सोन्याहून पिवळे हे
मैत्रीचे नाते अलगत जपावे

♻♻♻♻

## ती मैत्री आहे म्हणून
रामदास पुजारी,पुणे

ती मैत्री आहे म्हणून
टिकून आहे संवाद
टिकून आहे भरोसा
टिकून आहे विश्वास...

ती मैत्री आहे म्हणून
टिकून आहेत नाती
टिकून आहेत मनं
टिकून आहे जीवन...

ती मैत्री आहे म्हणून
आहे प्रेम,आहे ओढ
आहे क्षमा,समर्पण
आहेत मित्र-मैत्रिणी...

मैत्री असावी मातीशी
मैत्री असावी मातेशी
मैत्री असावी बापाशी
मैत्री असावी मुलांशी...

मैत्री असावी हवेशी
मैत्री असावी पाण्याशी
मैत्री असावी झाडांशी
मैत्री असावी सृष्टीशी...

मैत्री असावी मनाशी
मैत्री असावी ह्रदयाशी
मैत्री असावी साऱ्यांशी
सृष्टीतल्या प्रत्येकाशी...

-----

## वाचक प्रतिक्रिया -सेवक वार्ता, जुलै-२०२६

नेहमी प्रमाणे जुलै,२०२६ चार सेवक वार्ता अंक वाचनीय, उदबोधक, मनोरंजक झाला आहे. त्यासाठी अभिनंदन. देवशयनी एकादशीचे मुहूर्तावर अंकाचे प्रकाशन झाले आहे, हा पण योगायोगच म्हणावा लागेल.

. विठ्ठल त्र्यंबक पत्की

ααααα ααααα

## निधन वार्ता

(१) श्री. बाळू सुंभे, वन रक्षक अहिल्यानगर वन विभाग यांनी दि. २६-७-२०२६ रोजी संध्याकाळी ४ वाजेला आत्महत्या केली असे त्यांचे शालकांनी कळविले आहे. बाळू सुंभे, हे अत्यंत सोज्वळ, मितभाषी, हळू आवाजात स्मित हास्य करुन बोलणारी व्यक्ती होती.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो, ही प्रार्थना. सेवक संघ परीवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

(२) प्रफुल्ल दुर्वे याचे दि .२९-७-२०२६ रोजी रात्री साडे नऊ वाजता पुणे येथे दुःखद निधन झाले. त्यांचेवर दि. ३०-७-२०२६ रोजी दुपारी २:०० वाजता वैकुंठ स्मशानभूमी पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते एक कर्तबगार, प्रेमळ, कर्तव्यदक्ष वन अधिकारी होते. ते डहाणू वन विभागात कार्यरत होते. अडचणीच्या प्रसंगी कर्मचा-यांना मार्गदर्शन करुन समस्या सोडवण्यात ते तज्ञ होते. वरिष्ठ अधिकारीही त्यांचा सल्ला ऐकत असत.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो, ही प्रार्थना. सेवक संघ परीवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.



(३) ज्येष्ठ वन अधिकारी श्री. गंगाधरराव शिनगारे यांचे नुकतेच अल्प आजाराने लातूर येथे दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी निधन झालेले आहे. अंतिम संस्कार दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी मारवाडी स्मशान भूमी,लातूर नांदेड रोड येथे करण्यात आले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो, ही प्रार्थना. सेवक संघ परीवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

(४) शामू एम सरनागत, वन रक्षक, रिसाळा बीट, वनपरिक्षेत्र उमरझरी, नवीन नागझिरा वन्यजीव अभयारण्य, येथे कार्यरत असताना कर्तव्य बजावताना अचानक अस्वल हल्ल्यामध्ये शहीद झाले. वनसेवेचे कर्तव्य बजावत असलेल्या या वनरक्षकावर अस्वलाने हल्ला केला आणि त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. ते माजी सैनिक होते.

शामू शरणगत उमरझरी गेटवर नेहमीप्रमाणे आपले कर्तव्य बजावत होते. तेव्हा अचानक एक अस्वल आले आणि त्याने त्यांच्यावर हल्ला केला. हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच, वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. शरणगत यांच्या निधनाने वन विभागाला तीव्र दुःख झाले आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो, ही प्रार्थना. सेवक संघ परीवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.



**दिवा आणि वात एकमेकांशी स्पर्धा करीत नाही, कारण दोघांशिवाय प्रकाश पडत नाही.**

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशन : सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन : एस.के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६.